सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १४ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पायलटने जाणूनबुजून क्रॅश केले असावे, एअर इंडिया विमान दुर्घटनेबाबत आघाडीच्या विमान वाहतूक तज्ज्ञाचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अहमदाबाद**

गेल्या महिन्यात अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता, ज्यामध्ये २४१ जणांना जीव गमवावा लागला होता. अशात भारतातील एका आघाडीच्या विमान सुरक्षा तज्ज्ञाने अशी शक्यता वर्तवली आहे की, एअर इंडिया फ्लाइट १७१ चा अपघात हा जाणीवपूर्वक मानवी कृतीचा परिणाम असू शकतो, ज्यामुळे पहिल्यांदाच पायलटमुळे अपघात झाला असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.



भारतातील आघाडीच्या विमान वाहतूक तज्ज्ञांपैकी एक असलेले कॅप्टन मोहन रंगनाथन यांनी फ्युएल कटऑफ स्विचेस आणि कॉकपिट ऑडिओच्या क्रमाकडे लक्ष वेधले असून, हा अपघात कॉकपिटमध्ये जाणीवपूर्वक केलेल्या कृतींमुळे झाला असावा, असे म्हटले आहे. याबाबत एनडीटीव्हीने वृत्त दिले आहे.

एनडीटीव्हीशी बोलताना कॅप्टन मोहन रंगनाथन यांना विचारण्यात आले की, एखाद्या वैमानिकाने जाणूनबुजून फ्युएल बंद केले असावे का? कारण त्याला माहीत होते की असे केल्याने अपघात होऊ शकतो. तेव्हा कॅप्टन रंगनाथन म्हणाले, अगदी नक्कीच.

हे मॅन्युअली करावे लागते का?, असे कॅप्टन रंगनाथन यांना विचारले असता ते म्हणाले, फ्युएल सिलेक्टर्स स्लायडिंग प्रकारचे नसल्यामुळे, ते आपोआप किंवा वीज खंडित झाल्यामुळे बंद होऊ शकत नाहीत. हे सिलेक्टर्स अशा प्रकारे डिझाइन केलेले आहेत की ते एका निश्चित स्लॉटमध्ये राहतात आणि त्यांना वर किंवा खाली हलवण्यासाठी प्रथम बाहेर खेचावे लागते. त्यामुळे ते आपोआप बंद होण्याची शक्यता नसते. त्यामुळे हे निश्चितपणे जाणीवपूर्वक, हाताने बंद केले असण्याची शक्यता आहे.

दरम्यान, आजच भारताच्या विमान अपघात तपास ब्युरोने (विमान दुर्घटनांशी संबंधित तपास करणारी संस्था - AAIB) अहमदाबाद येथील एअर इंडियाच्या विमानाचा अपघात कशामुळे झाला, याचा प्राथमिक अहवाल सादर केला आहे. १५ पानांच्या या अहवालात कॉकपिटमध्ये दोन्ही वैमानिकांमध्ये काय संवाद झाला, याची माहिती देण्यात आली आहे.

या अहवालानुसार, इंजिन १ आणि २ चे दोन्ही फ्युएल स्विच एकमेकांपासून एका सेकंदात 'रन' वरून 'कट ऑफ' मध्ये बदलले गेले. कॉकपिटच्या मध्यवर्ती भागात पायथ्याशी असलेले हे स्विच गार्ड रेलने संरक्षित असतात आणि त्यांना हलवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

## जनसुरक्षा विधेयक न वाचताच विरोध; मुख्यमंत्री फडणवीस यांची उद्धव ठाकरेंवर नाव न घेता टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नागपूर**

'काही लोक' जनसुरक्षा विधेयकाचे एकही अक्षर न वाचता, त्याविरोधात बोलत आहेत. त्यांनी जर विधेयक वाचले, तर ते कधीच याविरोधात बोलणार नाहीत. जे विधेयकाच्या विरोधात बोलत आहेत, ते कडव्या डाव्यांचे एकाप्रकारे समर्थन करत आहेत, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता केली.

न्यायवैद्याक प्रयोगशाळेच्या भूमिपूजन कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री माध्यमांशी बोलत होते. शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुखउद्धव ठाकरे यांनी जनसुरक्षा विधेयक भारतीय जनता पक्ष सुरक्षा विधेयक असल्याची टीका केली होती. याकडे फडणवीस यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, की या कायद्यामुळे आंदोलनाचा अधिकार काढून घेतलेला नाही. कोणालाही सरकारविरोधात बोलणे, लिहिण्यापासून थांबवले नाही. सरकारविरोधात अभिव्यक्ती करण्याचा अधिकार कायम आहे. सर्वांना आंदोलन करता येईल. हा एकमेव कायदा आहे, ज्याच्यामध्ये संघटनांवर बंदी घातल्यावरच व्यक्तीवर कारवाई करता येईल. या कायद्यात



व्यक्तीला अटक करायची असेल, तर या कायद्यात स्थापन केलेल्या मंडळाकडून परवानगी घ्यावी लागेल. बंदी घातलेल्या संघटनेला ३० दिवसांत न्यायालयात जाता येईल. सुरक्षा विधेयकासंदर्भात आम्ही लोकशाही पद्धत राबवली. २५ सर्वपक्षीय नेत्यांची समिती करून त्यात कायद्यावर चर्चा केली. त्यांच्या सूचना लक्षात घेतल्या. समितीने एकमताने त्यांचा अहवाल दिला. जनतेकडूनही १२००० सूचना आल्या. त्यानुसार कायद्याच्या मसुद्यात सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर विधेयक मंजूर करून कायदा केला आहे. त्यामुळे भारताच्या राज्यघटनेला उलथून टाकण्याचा विचार करणाऱ्या माओवादी शक्तीविरोधात आपल्याला कारवाई करता येईल, असे फडणवीस म्हणाले.

## समोसे, जिलेबी, लाडू सिगारेटच्या पंगतीत!

### तंबाखू विरोधासारखे लागणार फलक; सुरुवात नागपूरपासून?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नागपूर**

सिगारेटच्या पाकिटावर कर्करोगाच्या चित्रासह सिगारेट ओढणे आरोग्यासाठी हानिकारक असल्याचा इशारा नमुद असतो. त्याप्रमाने नागपुरातील केंद्रीय कार्यालयांतील उपहार गृहात जिभेचे चोचले पुरवणाऱ्या समोसे, पकोडे, लाडूसह इतरही तेलकट आणि गोड पदार्थ सावधपणे खाण्याचा सल्ला देणारे ठळक फलक लावले जाणार आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे त्याबाबतचे आदेश काढले आहेत.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या नागपुरातील अखिल भारतीय आयुविज्ञान संस्थेसह राज्यातील केंद्रीय संस्थांमधील उपाहार गृहात रुग्ण व त्यांचे नातेवाईक, अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची गर्दी दिसते. येथे समोसे, पकोडे, भजी, लाडू, वडा पावसह इतरही तेलकट, गोड पदार्थांवर ग्राहकांकडून ताव मारला जातो. त्यामुळे या उपाहारगृहात प्रत्येक वर्षी या पदार्थांची विक्री वाढतच




असल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान येत्या काळात तुम्ही येथे नास्ता करणार असल्यास तुम्हाला उपाहारगृहातच समोसा-जलेबी कॉम्बोसह इतर कोणतेही तेलकट व गोड पदार्थ खाणार असल्यास तुम्हाला त्यात फॅट, शुगरसह इतरही आवश्यक माहिती देणारा ठळक फलक दिसणार आहे. त्यावर या पदार्थ सावधतेने खाण्याचा सल्ला नमुद राहिल. त्यामुळे या आरोग्य विषयक सूचना देणाऱ्या फलकांकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

तेलकट व गोड पदार्थासह जंक फूडचे सेवन मधुमेह, हृदयरोग आणि उच्च रक्तदाब यांसारख्या अनेक असंसर्गजन्य आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांशी जोडलेले आहे. बहुतेक लोकांना सिगारेट आणि अल्कोहोलच्या सेवनाशी संबंधित आरोग्य समस्यांची जाणीव असली तरी, जंक फूडच्या सेवनाने संभावित आरोग्याच्या धोक्याबाबत फारशी माहिती नाही. नागपूर हे जंक फूडवर तंबाखूसारखेच दक्षतेची सूचना देणारे पहिले भारतीय शहर असण्याचे संकेत आहे. शहरातील केंद्रीय कार्यालयातील उपाहार गृहात प्रत्येक आकर्षक नाश्त्याभोवती एक रंगीत साइन बोर्ड तुम्हाला आठवण करून देईल. त्यात सावधतेने खा.. तुमचा भविष्यकाळ तुमचे आभार मानेल, असे फलक असेल. आरोग्य मंत्रालयाने नागपूरमधील एम्स नागपूरसह सर्व सरकारी संस्थांना 'तेल आणि साखर बोर्ड' लावण्याचे आदेश दिले आहेत.

## मनसे प्रमुख राज ठाकरेंवर गुन्हा दाखल करा : डीजीपींकडे लेखी तक्रार दाखल

### पूर्वनियोजित गुन्ह्यांना सहकार्य करणारे विधान केल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

राज्यात सध्या सुरू असलेल्या मराठी-हिंदी भाषेच्या वादाच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात पोलिस महासंचालकांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. वरळी येथील ठाकरे बंधूंच्या विजयी जल्लोष मेळाव्यात राज ठाकरे यांनी भडकाऊ भाषण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही तक्रार ॲड. नित्यानंद शर्मा, ॲड. पंकजकुमार मिश्रा आणि ॲड. आशिष राय यांनी संयुक्तपणे केली आहे.



ॲड. नित्यानंद शर्मा, ॲड. पंकजकुमार मिश्रा आणि ॲड. आशिष राय यांच्या म्हणण्यानुसार, सध्या महाराष्ट्रात परप्रांतीयांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर देशाची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली असून, या प्रकाराला राज ठाकरे मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तसेच, मुंबईतील भाषणाच्या अनुषंगाने राज ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचीही मागणी पोलीस महासंचालकांना पाठवलेल्या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

**पूर्वनियोजित गुन्ह्यांना सहकार्य करणारे विधान**

मराठी ही महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा असून तिचा सन्मान करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. मात्र, अलीकडच्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून इतर राज्यांतून आलेल्या नागरिकांवर भाषेसंदर्भात मारहाण, अत्याचार व सार्वजनिक अपमानाच्या अनेक घटना घडत आहेत. ही परिस्थिती गंभीर असून राज्यातील सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेला धक्का देणारी व संविधानविरोधी ठरते.

५ जुलै २०२५ रोजी मनसेचे राष्ट्रीय अध्यक्ष राज ठाकरे यांनी वरळी डोम, मुंबई येथे आयोजित जाहीर सभेमध्ये केलेल्या भाषणात भडकाऊ, द्वेषमूलक आणि उत्तेजक विधाने केली. विशेषतः, त्यांच्या भाषणात असा उल्लेख आढळतो की, परप्रांतीयांसोबत अशा कोणत्याही घटनेचा पुरावा म्हणून व्हिडिओ काढू नका. ही सूचना अत्यंत गंभीर असून पूर्वनियोजित गुन्ह्यांना सहकार्य करणारी व त्यांना प्रोत्साहन देणारी आहे. या विधानामधून पुरावे नष्ट करण्याचा अथवा लपवण्याचा उद्देश स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार हे गंभीर गुन्हे ठरतात, असे संबंधित पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

## महापालिका निवडणुकीआधीच शिवसेना कुणाची फैसला होणार, कुणाला मिळणार चिन्ह?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

राज्यात तीन वर्षांपूर्वी सत्ता बदल झाला. शिवसेना पक्ष तीन वर्षांपूर्वी फुटला. तेव्हापासून शिवसेना पक्ष कुणाचा? निवडणूक चिन्ह कोणाकडे राहणार? या बद्दलची कायदेशीर लढाई सुरु आहे. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्याबाजूने निकाल दिला. आज अधिकृत शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिलं. उद्धव ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल हा खटला




लढवत आहेत. आज या संदर्भात सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. पण तारीख पे तारीखचा सिलसिला सुरु राहिला. आजची सुनावणी ऐकण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला. पुढची तारीख देतो, असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं. आम्ही ऑगस्टमधील तारीख देतो असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून आजच सुनावणी घ्या अशी मागणी कोर्टात करण्यात आली होती. मात्र सुप्रीम कोर्टाने ऑगस्ट महिन्यातील तारीख देऊ असं म्हटलेलं आहे. तब्बल दीड वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी होत होती. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूका येत आहेत. ऑगस्टमधील तारीख देण्याचा प्रयत्न करुन असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं. ऑक्टोंबर महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होऊ शकतात. ऑगस्टमध्ये तारीख मिळून सुनावणी पूर्ण झाल्यास शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचं? याचा निर्णय होऊ शकतो.

**उद्धव ठाकरे यांना मोठा दिलासा**

वकील सिद्धार्थ शिंदे पुढे बोलताना म्हणाले, आज सुप्रीम कोर्टाने केलेले विधान हे उद्धव ठाकरे यांना मोठा दिलासा मिळाला असेच म्हणावे लागेल. कारण, मागील २ वर्षांपासून जी अनिश्चितता होती ती आता सुप्रीम कोर्टानेच दूर केली आहे. कोर्टाने स्वतःच या प्रकरणी ऑगस्ट महिन्यातील तारीख देण्याची घोषणा केली आहे. त्यात एक-दोन दिवस सुनावणी चालेल, सुनावणी तहकूब होईल. पण चालू वर्षाच्या आत हे प्रकरण निकाली निघेल हे नक्की.


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र पिंजून काढणार

### निवडणुकीच्या तयारी बाबत आढावा; 'महाजनादेश' यात्रे सारखीच तयारी?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यासाठी आता महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. या आधी देखील फडणवीस यांनी महाजनादेश यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्र पिंजून काढला होता. तशीच तयारी यावेळी देखील सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता लवकरात लवकर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. स्थानिक पातळीवर पक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी या निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जातात. भारतीय जनता पक्ष हा कायमच निवडणुकीच्या मोड मध्ये



असतो, असे म्हटले जाते. तसेच आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी देखील पक्षाच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक मतदारसंघाचा आढावा या माध्यमातून देवेंद्र फडणवीस घेणार आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी आणि महायुतीच्या माध्यमातून लढल्या जातील का? याबाबत अद्याप साशंकता कायम आहे. महाविकास आघाडी ही विधानसभा निवडणुकीपुरतीच असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले होते. तर महायुती एकत्र लढणार असल्याचे संकेत फडणवीस यांनी स्वतः दिले होते. मात्र, स्थानिक पातळीवरील राजकारण पाहता, अशा निवडणुका या सर्वच पक्ष स्वतंत्र लढणे पसंत करतात. त्यामुळे आता या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र राहते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विधानसभेत 'चड्डी बनियान' शब्दावरून आदित्य ठाकरे आणि नीलेश राणेत जुंपली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

विधानसभेत चड्डी बनियान शब्दावरून आदित्य ठाकरे आणि नीलेश राणे या दोघांत चांगलाच कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळाले. विधानसभेत बोलताना शेवटी आदित्य ठाकरे मुख्यमंत्र्यांकडे मागणी करताना म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी खूप सहनशीलता दाखवली आहे. आता त्यांनी मुंबईकरांच्या मागण्या असतील, शहरातल्या मागण्या असतील आणि जे काही हे चड्डी बनियान गँगचे चालू आहे त्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नीलेश राणे यांनी चड्डी बनियान शब्दावरून आक्रमक पवित्रा



घेतल्याचे पाहायला मिळाले. चड्डी बनियान शब्द रूलिंगमधून काढून टाकण्यात यावा, अशी मागणी राणे यांनी केली. तसेच हिंमत असेल तर चड्डी बनियान कोण हे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट करावे, असे ते म्हणाले.

## संपादकीय ......

# बिहारमध्ये सत्ताधाऱ्यांची कसोटी

बिहारला अनेकदा देशाची 'राजकीय प्रयोगशाळा' म्हटले जाते आणि हे राज्य पुन्हा राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आले आहे. तेथील निवडणुकीची लढाई आता केवळ पाटण्याच्या खुर्चीपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर भाजपसाठी बिहारमधील सत्ता टिकवणे हे आता त्यांच्या राजकीय विश्वासार्हतेची आणि संघटनात्मक ताकदीची कसोटी बनली आहे. बिहार राज्य हातातून निसटले, तर दिल्लीची सत्ता टिकवणे आव्हानात्मक ठरेल, अशी चर्चा पक्षांतर्गत आणि विरोधकांमध्ये जोर धरू लागली आहे.

निवडणूक आयोगाकडून या संपूर्ण परिस्थितीत राबवण्यात येत असलेल्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एआयआर) मोहिमेने आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. विरोधकांचा आरोप आहे की, ही मोहीम म्हणजे गरीब, मुस्लिम आणि कागदपत्रे नसलेल्या लोकांना मतदार यादीतून वगळण्यासाठी केलेली एक 'सॉफ्ट नागरिकता तपासणी' आहे. यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, हा मुद्दा अधिक गंभीर बनल्यास केंद्र सरकारवरही नैतिक दबाव वाढेल. बिहारचे राजकारण जातीय समीकरणांवरच चालते. तेथे विकासाच्या गप्पांदरम्यानही मतदान जातीच्या आधारावरच होते. त्यामुळेच प्रत्येक पक्षाने जातीय समीकरणे लक्षात घेऊनच आपले पत्ते पिसले आहेत. भाजपला हे चांगलेच माहीत आहे की, नितीश कुमार यांची साथ ही त्यांची गरजही आहे आणि ताकदही. नितीश कुमार यांच्याशिवाय भाजपने बिहारमध्ये कधीही सरकार स्थापन केलेले नाही. २०१० पासून आतापर्यंत जदयू आणि भाजपच्या जोडीने अनेकदा समीकरणे बनवली आणि बदलली; पण प्रत्येक वेळी नितीश कुमार यांची खुर्ची अबाधित राहिली. त्यांच्यावर 'पलटूराम' म्हणून टीकाही झाली; पण बिहारच्या राजकारणात त्यांचा प्रभाव आजही कायम आहे, हे एनडीएचे रणनीतिकार जाणून आहेत.

नितीश कुमार यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळात महिला मतदारांमध्ये मोठी पकड निर्माण केली आहे. दारूबंदी, मुलींसाठी सायकल योजना यांसारख्या योजना त्यांच्यासाठी 'व्होट बँक'पेक्षाही एक कायमस्वरूपी विश्वास बनल्या आहेत. बिहारमध्ये महिला मतदारांची टक्केवारी पुरुषांपेक्षा जास्त राहिली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ती सुमारे ५९ टक्क्यांपर्यंत पोहोचली. हा वर्ग निवडणुकीत आपला मोठा आधार बनेल, असा भाजपला विश्वास आह; पण नितीश कुमार यांचे वय आणि प्रकृती आता एक नवीन आव्हान बनले आहे. त्यांच्या करिश्माला पूर्वीसारखी धार राहिलेली नाही, अशी चिंता पक्षाच्या आतल्या गोटात आहे. त्यांच्या मतदारांमध्येही, विशेषतः तरुण आणि काही महादलित गटांमध्ये, फूट पडू लागल्याचे दिसत आहे. विरोधक याच कमकुवतपणावर निशाणा साधत आहेत. राजद नेते तेजस्वी यादव यांनी आपल्या रणनीतिला 'माय+बाप' असे नाव दिले आहे. म्हणजेच, मुस्लिम-यादव या पारंपरिक व्होट बँकेत बहुजन, अगडा (सवर्ण), आधी आबादी (महिला) आणि गरीब वर्गाला जोडण्याचा हा प्रयत्न आहे. मागील काही निवडणुकांमध्ये राजदला सर्वाधिक मतांची टक्केवारी मिळाली; पण जागांचे गणित त्यांच्या विरोधात गेले. यावेळी तेजस्वी यादव यांनी पासवान, कुशवाहा, धानुक, मल्लाह यांसारख्या जातींमध्ये शिरकाव करण्यासाठी नवीन चेहरे पुढे आणले आहेत. मंगनी लाल मंडल यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड हा याच रणनीतीचा भाग आहे. त्यांची ईबीसी आणि धानुक समाजात चांगली पकड आहे.

काँग्रेसही मागे नाही. त्यांनी जाटव म्हणजेच रविदास समाजातील राजेश कुमार यांना प्रदेशाध्यक्ष बनवून दलित मतदारांना आकर्षित करण्याची रणनीती आखली आहे; मात्र मायावतींचा बहुजन समाज पक्षही येथे आव्हान उभे करत असल्याने रविदास समाजाची मते कोणाकडे जाणार, हा प्रश्न आहे. तर दुसरीकडे, डावे पक्ष, विशेषतः सीपीआय (एम-एल) लिबरेशन, उत्तर बिहारमधील गरीब भूमिहीन, दलित आणि लहान ओबीसी वर्गांवर प्रभाव टाकत आहेत. ही सर्व लहान-मोठी समीकरणे जुळून आल्यास एनडीएला पराभूत करता येईल, अशी महाआघाडीला आशा आहे. याच समीकरणांच्या लढाईत भाजपनेही आपले नवे गणित मांडले आहे. चिराग पासवान, ज्यांचे दिवंगत वडील रामविलास पासवान एकेकाळी बिहारच्या दलित राजकारणातील सर्वात मोठा चेहरा होते, ते आता एनडीएचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. पासवान व्होट बँक, विशेषतः पश्चिम आणि मध्य बिहारमध्ये, भाजप-जदयू आघाडीला बळकटी देते. जीतन राम मांझी यांचाही महादलित समाजात प्रभाव आहे. उपेंद्र कुशवाहा यांचा पक्षही कुशवाहा-कोईरी मते मिळवण्यासाठी मदत करत आहे.

अशा परिस्थितीत बिहारमधील पराभव म्हणजे भाजपच्या जातीय 'सोशल इंजिनिअरिंग' मॉडेलचा पराभव असेल, ज्याचा परिणाम उर्वरित हिंदी भाषिक राज्यांवरही होऊ शकतो. महाराष्ट्रामध्ये हिंदी भाषिकांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेमुळे भाजप आधीच चिंतेत आहे. हिंदी भाषिकांच्या मनातील जखमेवर मलम लावण्यासाठी खासदार निशिकांत दुबे यांच्यामार्फत राजकीय हल्लाही करवला, जेणेकरून बिहार विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून परतणाऱ्या मतदारांच्या रोषाचा सामना करावा लागू नये. एका अंदाजानुसार, केवळ मुंबईतच बिहारचे २.५ लाख प्रवासी कामगार राहतात.

भारताच्या २०११ च्या जनगणनेनुसार, ५,६८,६६७ लोक बिहारमधून महाराष्ट्रात आले होते. यावेळच्या बिहार निवडणुकीत बेरोजगारी आणि स्थलांतर हे देखील मोठे मुद्दे आहेत. बिहारमधून दरवर्षी लाखो तरुण रोजगारासाठी दिल्ली, पंजाब, गुजरात किंवा महाराष्ट्रात जातात. रोजगाराची

# मणिपुरम् गोल्ड लोन बँकेत आग लागल्याने उडाला गोंधळ

## सीसीटीव्ही सिस्टीममध्ये विद्युत प्रवाह संचारल्याने लागली आग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**-रविवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास जयस्तंभ चौकातील मणिपुरम गोल्ड लोन बँकेतून अचानक धुर बाहेर निघताना दिसताच नागरिकांनी पोलीस व अग्निशमन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळविले.

स्थानिक जयस्तंभ चौकातील मणिपुरम गोल्ड लोन बँकेतून सकाळी ८ वाजताच्या सुमारास अचानक बँकेतून धुर बाहेर निघताना दिसताच बँकेत आग लागल्याचे लक्षात आले. याबाबत बँकेचे व्यवस्थापक मनीष माहुरे यांना माहिती मिळताच त्यांनीबँकेत धाव घेतली आणि पोलीस व अग्निशमन विभागाल माहिती दिली. माहिती

मिळताच महापालिकेच्या अग्निशमन पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच बँकेतील सर्व इलेक्ट्रिक सप्लाय बंद करून पाण्याचा मारा केला. त्यामुळे काही वेळातच आग आटोक्यात आली. त्यानंतर जवानांनी बँकेत जाऊन पाहिले असता बँकेत धुर पसरल्यामुळे चांगलाच गोंधळ उडाला. त्यामुळे तत्काळ स्मोक डिटेक्टर मागविले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी बँकेच्या आत जावून पाहणी केली असता सीसीटीव्ही सिस्टीमध्ये विद्युत प्रवाह संचारल्यामुळे आग लागल्याचे लक्षात याले. तेव्हा महावितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांना बोलाविण्यात आले. लगेच कर्मचारी बँकेत पोहचले आणि वीजपुरवठा खंडीत करून बँकेची पाहणी केल्यानंतर बँकेचे सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. यावेळी फायरमन अमोल साळुंखे, निशांत राठोड, रोशन अलुडे, राहुल घोडे आणि वाहन चालक नितीन इंगोले आणि रोशन आरवडे यांनी अतिशय धाडसी आणि दक्षतेने कारवाई केली.




### अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

आगीत बँकेचे अंदाजे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. परंतु बाजुला असलेल्या श्री बालाजी रिअल इस्टेट, आदित्य बिर्ला म्युच्युअल फंड आणि मणिपुरम गोल्ड लोन या तीन कार्यालयांचे सुमारे ५० लाखांचे संभाव्य नुकसान अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे टळले. असे बँकेच्या व्यवस्थापकाने सांगितले.

# गुडघ्यातून येतोय कट-कट आवाज?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**




गुडघ्यांमधून 'कट-कट' असा आवाज येणे हे पोषक तत्वांची कमतरता आणि सांध्यांमधील सायनोवियल फ्लुइडमधील बदलांमुळे होऊ शकते. व्हिटॅमिन डी, कॅल्शियम आणि कोलेजनची कमतरता ही समस्या वाढवू शकते. योग्य आहार आणि व्यायामाने या त्रासापासून आराम मिळू शकतो. आजकाल अनेक लोकांना, विशेषतः जिने चढताना, खाली बसताना किंवा उठताना गुडघ्यांमधून 'कट-कट' किंवा 'क्रॅकिंग' सारखा आवाज येण्याची समस्या जाणवते. ही समस्या आता तरुण पिढीमध्येही वेगाने वाढत आहे.



जर तुम्ही या समस्येने त्रस्त असाल, तर सर्वप्रथम तुमच्या आहारावर लक्ष देणे आवश्यक आहे.

**आहार:** आपल्या रोजच्या आहारात कॅल्शियमयुक्त पदार्थांचा समावेश करा, जसे की दूध, पनीर, दही, तीळ, बदाम आणि हिरव्या पालेभाज्या. व्हिटॅमिन डीसाठी सकाळच्या कोवळ्या उन्हात किमान १५-२० मिनिटे बसा. यामुळे शरीराला नैसर्गिकरित्या व्हिटॅमिन डी मिळेल. जर ऊन मिळत नसेल किंवा शरीरात त्याची जास्त कमतरता असेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने सप्लिमेंट्स घेणे फायदेशीर ठरू शकते.

**कोलेजन:** शरीरातील कोलेजन वाढवण्यासाठी बोन ब्रॉथ (हाडांचे सूप), आवळा, अक्रोड आणि व्हिटॅमिन सी युक्त फळे जसे की संत्री आणि लिंबू यांचे सेवन करणे खूप फायदेशीर आहे.

**व्यायाम आणि योगासने:** हलका व्यायाम आणि योगासने केल्याने गुडघे मजबूत होतात. विशेषतः वज्रासन, त्रिकोणासन आणि ताडासन यांसारखी योगासने हाडांची मजबुती आणि लवचिकता वाढवण्यास मदत करतात. रोज ३० मिनिटे चालणे किंवा जिने चढणे यांसारखे हलके व्यायामदेखील या समस्येपासून आराम देऊ शकतात.

# नैसर्गिक शेती करण्यासाठी १००% राज्य पुरस्कृत 'ही' योजना शेतकऱ्यांसाठी फायदेशीर; कसा घ्याल लाभ?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात नैसर्गिक शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा शेतकरी बांधावरच निर्माण करतील यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन (१००% राज्य पुरस्कृत योजना) सुरु करण्यात आली आहे.

**योजनेचा उद्देश-** नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर थांबवणे.

जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवुन जमिनीची सुपिकता व आरोग्य सुधारणे.

रसायनमुक्त सुरक्षित, सकस व पोषणयुक्त नैसर्गिक व सेंद्रिय शेतमाल उत्पादित करणे.

नैसर्गिक व सेंद्रिय शेतमालाची मुल्य साखळी विकसित करणे.

नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे.

शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्तरावर शेतावरील जैव निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करुन स्थानिक पातळीवर जैविक निविष्ठा उपलब्ध करणे.

**योजनेची व्याप्ती**

**राज्यातील सर्व ३४ जिल्हे**

योजनेचे स्वरूप/बाबी/घटक/ अनुदान मर्यादा

गट आधारित, ५० हेक्टर क्षेत्राचा एक गट, १० गटांची एक शेतकरी उत्पादक कंपनी.

एकदा निवड केलेल्या लाभार्थी/ गटास ३ वर्षे लाभ.

प्रति शेतकरी २ हेक्टरच्या मर्यादित लाभ.

सेंद्रिय शेतीवर आधारित प्रशिक्षण, शेतात सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करणे, सेंद्रिय प्रमाणिकरण करणे, सेंद्रिय मालाची मूल्यवृद्धी करून विक्री व्यवस्था करणे.

रु. १३,२००/- प्रति हेक्टर म्हणजेच रु. ६.६० लाख प्रति गट तीन वर्षात अर्थसहाय्य.

**लाभार्थी पात्रतेचे निकष**

योजनेत एका शेतकऱ्याला दोन हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देय राहील.

रासायनिक खते, किटकनाशके व तणनाशके तसेच बी.टी. बियाणे वापरता येणार नाहीत. सेंद्रिय प्रमाणीकरणासाठी आवश्यक शेती पद्धतीचा अवलंब करण्यास स्वेच्छेने तयार असलेल्या शेतकऱ्यांची निवड करावी.







शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

सेंद्रिय शेतीबद्दल जागृत असलेल्या शेतकऱ्यांचा योजनेत प्राथम्याने सहभाग करावा.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील त्या त्या जिल्ह्यातील प्रवर्गांच्या शेतकऱ्यांच्या प्रमाणात किमान शेतकऱ्यांची योजनेसाठी निवड करावी. महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देवून किमान ३० टक्क्यांपर्यंत महिलांचा योजनेत सहभाग राहील असे पहावे. समुह स्तरावर स्थापन होणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपनी मध्ये शेतकऱ्यांना भागधारक होणे बंधनकारक आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा**

राज्यस्तरावर कृषी संचालक (आत्मा), जिल्हास्तरावर-प्रकल्पसंचालक, आत्मा (सर्व)

अधिक माहितीसाठी

कृषी विभाग सहायक कृषी अधिकारी, मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, आत्मा (बीटीएम) यांचेकडे संपर्क साधावा.

## स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्यांसाठीचे पर्यायी वेळापत्रक जाहीर, २६ जुलैपासून विद्यापीठाची परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**-क्रीडा, सांस्कृतिक, आविष्कार, आव्हान, उत्कर्ष अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेणा-या व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संबंधित अधिका-यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या उन्हाळी - २०२५ विद्यापीठीय पर्यायी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार आगामी २६ जुलैपासून सदर परीक्षा घेण्यात येणार आहेत. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळवण्यात आले आहे. सदर वेळापत्रकानुसार, अमरावती जिल्ह्या तील विद्यार्थ्यांची परीक्षा ही विद्याभारती महाविद्यालय (केंद्र क्रमांक १२६), अकोला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बुलडाणा विद्यार्थ्यांची विज्ञान महाविद्याल, मलकापूर (३२२), यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (४०१) आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही त्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरील नमूद परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेशपत्र पर्यायी परीक्षेकरिता कायम राहतील. तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रनिहाय रोललिस्ट विद्यापीठाच्या www.sgb au.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

# पाच वर्षात मिळणार मजबूत शेत रस्ते, अमरावतीत आमदारांची लक्षवेधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४धामणगाव रेल्वे**

शेतकऱ्यांना पाणंद रस्त्यासाठी ग्रामविकास विभाग २५/१५ या शीर्षातून ५० टक्के निधी दिला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दरम्यान नागपूर जिल्ह्यात राबविलेला पाणंद रस्त्याचा पॅटर्न राज्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती विधानभवन सभागृहात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी अद्यापही पाणंद रस्ते नाही याविषयी लक्षवेधी सूचना नियम १०५ अन्वेय आ प्रतापदादा अडसड यांच्यासह आ. अभिमन्यु पवार, आ. सुमित वानखेडे, आ. राजेश बकाने, आ. राजेश वानखडे, आ. प्रविण तायडे, आ. उमेश बावलकर या आमदारांनी लक्ष वेधले होते.राज्यातील नागरीकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे विज्ञान युगात शेतीची मशागत ते कापणी आणि वाहतूक ही यंत्रावर अवलंबून असते शेतकऱ्यांना रस्त्याची नितांत आवश्यकता असतांना नकाशावरील शेतरस्ते, पाणंद रस्ते, शिवरस्ते बंद असल्याने वादावादी आणि भांडणतंटे याची अनेक प्रकरणे आहे.



आजही शेतात जाण्यासाठी पाणंद रस्ते नाही अशी लक्षवेधी शुक्रवारी विधानभवनात मांडली यावर उत्तर देताना या रस्त्यासाठी ग्राम विकास विभागाच्या २५/१५ या शीर्षातून ५० टक्के निधी दिला जाईल तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली जाईल ही समिती एक महिन्याच्या आत अहवाल देईल.

शेती रस्त्यासाठीची सर्व एक सर्वेक्षक योजना सरकार तयार करेल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केली धामणगाव मतदार संघात सर्वाधिक पाणंट रस्त्याचा प्रश्न आमदार प्रतापदादा अडसड यांनी सोडविला. उर्वरित रस्त्यासाठी त्यांनी लक्षवेध सूचनेत सहभाग घेतला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सोमवार दि. १४ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# शंकरनगर मार्गावरील एरिया ९१ रेस्ट्रो बारवर पोलिसांचा छापा

## शहर गुन्हे शाखा युनिट २ ची धडाकेबाज कारवाई

## ४० तरुणींना समन्स बजावून सोडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती-** स्थानिक शंकरनगर मार्गावरील एरिया ९१ रेस्ट्रो बारवर गुन्हे शाखेच्या युनिट २ ने छापा टाकून येथून ७० ते ८० युवक युवतींना ताब्यात घेण्यात आले. यात अनेक अल्पवयीन मुला-मुलींचाही समावेश असल्याचे समजते. रविवारी (दि.१३) रात्री ही कारवाई करण्यात आली.

शंकरनगर मार्गावरील एरिया ९१ रेस्ट्रो बारमध्ये वेडींग पार्टीच्या नावावर आयोजकांनी युवक-युवतींसह अल्पवयीन मुला-मुलींनाही आमंत्रित केले होते. खालच्या बाजूला मिट इन मेल्ट नावाचे दुकान तर त्या बाजूला एरिया ९१ रेस्ट्रो बारचे बोर्ड लागले आहे. त्यावरती दुसऱ्या माळ्यावर खुल्या हॉलमध्ये मुला-मुलींना बोलाविण्यात आले होते. याठिकाणी दारूसह ड्रग्ज पुरविले जात असल्याची गुप्त माहिती पोलिसाना मिळाली. या माहितीच्याआधारे गुन्हे शाखेच्या युनिट २ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हान यांच्या नेतृत्त्वात पोलिसांनी रविवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास एरिया ९१ -रेस्ट्रो बारमध्ये धाड घातली. त्यावेळी - बारमध्ये ७० ते ८० युवक-युवतींसह काही अल्पवयीन मुले-मुली आढळून आली. त्यांना पोलिसानी ताब्यात घेतले. पोलिसांच्या दोन व्हॅनमधून त्यांना वैद्यकीय तपासणीकरिता जिल्हा सामान्य रूग्णालयात नेण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी व क्यूआरटीची चमूही घटनास्थळी दाखल झाली होती. घटनास्थळी पोलीस उपायुक्त श्याम घुले व सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांनी भेट दिली. हे बार आनंद राजेंद्र भेले याच्या मालकीचे असल्याचे समजते.



कलर बॉक्स)१८० पेक्षा अधिक मेडिकलसाठी रवाना

या संदर्भात गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण आणि एपीआय महेश इंगोले यांनी सांगितले की, एरिया ९१ रेस्ट्रो बारमध्ये बेकायदेशीर पार्टी आयोजित केल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या पार्टीत तरुण-तरुणींची संख्या मोठी आहे. पोलिसांनी ४० हून अधिक मुलींना त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले परंतु उर्वरित मुलांची वैद्यकीय तपासणी सुरू आहे. आतापर्यंत अंदाजे ७० ते ८० तरुणांना वैद्यकीय उपचारांसाठी पाठवण्यात आले आहे. क्लबमध्ये अजूनही ५० हून अधिक तरुण आहेत ज्यांची वैद्यकीय तपासणी देखील केली जाईल. ही कारवाई रात्री उशिरा पर्यंत सुरू होती.-

# रिद्धपूर येथील स्मशानभूमीत पेटविला अग्नी, उत्तराषाढा रात्री मंत्रोच्चार

## 'ती' महिला कोण? गावासह परीसरात वेगवेगळ्या चर्चेला उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४रिद्धपूर :** १२ जुलै रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास स्थानिक हिंदू स्मशानभूमीत एक तरुण स्त्री एकटी आगीसमोर स्मशानात मंत्रोच्चार करीत असल्याचे शेतातून परतणाऱ्या तीन युवकांच्या निदर्शनास आले. या अकल्पित प्रसंगाने मनात भीतीचे काहूर दाटलेल्या तरुणांनी गाव गाठून माहिती दिली. ग्रामस्थ घटनास्थळी दाखल होताच ती तरुणी अंधारात गडप झाली. या घटनेने रिद्धपूर परिसरात चर्चेला उधाण आले आहे.आषाढ कृष्ण' अर्थात १२ जुलै रोजी उत्तराषाढा अंधाररात्री १० वाजेच्या सुमारस तीन नवतरुण शेतीतून हिदू स्मशानभूमीजवळून घरी परत येत होते. स्मशानभूमीजवळून एकमेकांच्या हिमतीने चालत असताना प्रवेशद्वारावर दिवा जळत असल्याचे त्यांनी पाहिले आणि यामुळे आधीच घाबरगुंडी उडाली असलेल्या त्या तरुणांची एक तरुण स्त्री एकटी आगीसमोर स्मशानात मंत्रोच्चार करीत असल्याचे पाहून पाचावर धारण बसली. अर्थात त्यांना ती नेमकी काय उच्चारत आहे, हे कळलेचनाही. गडद अंधारात या अकल्पित आणि भीतीचे कापरे उडविणाऱ्या घटनेने त्यांनी गाव गाठणे उचित मानले. गावाजवळ पोहोचत असतानाच अनेक तरुणांनाफोनवरून माहिती दिली. वृत्त वाऱ्यासारखे पसरले आणि साधारणतः २० तरुणांनी स्मशानाकडे आगेकूच केली. तरुणाईचा जथा आपल्याकडे येत असल्याचे पाहून तथाकथित मांत्रिक महिलेने अंधाराच्या आडोशाने पळ काढला. मोबाइल आणि टॉर्च घेऊन तथाकथित मांत्रिक महिलेची तासभर शोधाशोध करण्यात आली; परंतु शेजारी नदीपात्र, उंचसखल शेतशिवार आणि लपण्याजोगी झुडपे यामुळे तिचा पत्ता लागला नाही. अखेर शोधमोहीम थांबवून सगळ्यांनी घरचा रस्ता धरला.



### सर्व अंधश्रद्धा, भीती बाळगू नये

दरम्यान, ती कुणाच्या तरी आत्म्याला जागृत करण्यासाठी तांत्रिक साधना करीत होती. तिला कुणीतरी सुपारी देऊन हा तांत्रिक सोपस्कार पार पाडण्यास सांगितले असावे, अशा चर्चांना उधाण आले. तथापि, ठामपणे कुणीही काहीही सांगण्यास तयार नव्हते. कोणतीही भीती बाळगण्याचे काहीएककारण नाही. ती महिला जर सशक्त असती, तर तिला पळून जाण्याचे कारण नव्हते. ही सर्व अंधश्रद्धा आहे.- **तात्यासाहेब मेश्राम,** माजी सभापती, जिल्हा परिषद.

### चंद्रशेखर भोयर यांच्या मागणीला यश

# आता शिक्षकांना पाठ टाचण करण्याची सक्ती नाही

## शिक्षण उपसंचालकांनी निर्गमित केले पत्र: शिक्षणाधिकाऱ्यांना दिले निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

अमरावती विभागातील शिक्षकांना पाठ टाचण म्हणजेच लेसन प्लॅन करण्याची शक्ती करण्यात येऊ नये अशी मागणी शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सह संयोजक चंद्रशेखर भोयर यांनी केली होती. त्यांच्या मागणीची शिक्षण उपसंचालकांनी दखल घेत शिक्षकांना पाठ टाचणकरण्याची सक्ती करू नये असे निर्देश एका पत्राद्वारे शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये असणाऱ्या अनेक शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांना पाठ टाचण म्हणजेच लेसन प्लॅन करण्याची शक्ती करण्यात आली असून शिक्षणाधिकाऱ्यांनी त्या संदर्भात तोंडी सूचना दिल्याची माहिती आहे. पाठ टाचण बंधनकारक केल्यामुळे शिक्षकांवर मोठा ताण येत असून शैक्षणिक कार्यामध्ये अडथळा येत आहे. अनेक शाळांमध्ये पुरेसे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नसल्यामुळे कार्यरत शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त इतरही अनेक शैक्षणिक आणि प्रशासकीय कामे करावी लागतात.

त्यामुळे पाठ टाचण सादर करण्याची सक्ती केल्यास त्यांच्याशैक्षणिक कामावर परिणाम होण्याचीशक्यता आहे. या सर्व महत्वपूर्ण बाबी लक्षात घेता शिक्षकांना पाठ टाचण सादर करण्याची शक्ती करण्यात येऊ नये अशी मागणी शिक्षक महासंघाचे अध्यक्ष व भाजप भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी शिक्षण उपसंचालकांकडे एका निवेदनाद्वारे केली होती. शिक्षण उपसंचालकांनी या महत्वपूर्ण मागणीची दखल घेत शिक्षकांना पाठ टाचण सादर करण्याची सक्ती करण्यात येऊ नये असे निर्देश अमरावती विभागातील शिक्षणाधिकाऱ्यांना दिले असून त्या संदर्भातील एक पत्र निर्गमित केले आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### शिक्षकांवरील ताण कमी होणार : भोयर

ही मागणी सातत्याने शासन दरबारी मांडली होती. पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नांमुळे अखेर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. हे एक मोठे यश असून, शिक्षकांच्या दैनंदिन कामकाजातील मोठा ताण कमी करणारा निर्णय असल्याचे मत चंद्रशेखर भोयर यांनी व्यक्त केले आहे.

# धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवपदाच्या आदेशास अंतरिम स्थगिती

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४धा.रेल्वे -**कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव प्रवीण वानखडे यांच्या सचिवपदाच्या आदेशाला राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे पुढील सुनावणी होईपर्यंत अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे. यामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. आता सचिव पदाचा वाद शासन दरबारी पोहोचला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहन इंगळे यांनी महाराष्ट्र राज्याचेपणन संचालक पुणे, कृषीउत्पन्न बाजार समितीचे सचिव व प्रविण वानखडे यांच्या विरुद्ध राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या समोर, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५२ब अन्वये अपिल दाखल केली होती. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहन इंगळे यांनी शासनासमोर दाखल अपील अर्जात प्रविण वानखडे, सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती, धामणगाव रेल्वेयांच्यावर आर्थिक बाबींबाबत आरोप असताना व बाजार समितीने दिलेली पदोन्नती ही जम्पींग पदावर नियमानुसार नसताना सुद्धा दिली. याबाबतीत प्रतिवादी क्र.१ तथा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जिल्हा उपनिबंधक यांची शिफारस नसताना थेट सादर केलेल्या प्रस्तावास कोणतीही शहानिशा न करता ०६.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली. पणन संचालक यांचे आदेश रद्द करुन, सदर कर्मचारी यांना पदावनत करण्याबाबत व देण्यात आलेले वेतन वभत्ते वसुल करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ५२ (ब) अन्वये माझ्यासमोर अपील सादर केले होते. अपिल अर्जामध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती, धामणगाव रेल्वे यांनी सन २०१० मध्ये सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये कोणतीही परिक्षा न घेता थेट मुलाखती घेऊन ११ कर्मचारी नियुक्त केले व त्याच दिवशी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांनी मान्यता सुध्दा दिली. समितीने त्याच दिवशी सर्व नियुक्त कर्मचारी यांना नियुक्ती आदेश देऊन रुजु सुध्दा केले.



सदर भरती प्रक्रियेमधूनच प्रविण साहेबराव वानखडे हे बाजार समितीमध्ये लिपिक पदावर रुजू झाले होते. सदर सरळसेवा भरती प्रक्रिये संबंधात उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.५१८७/२०१४ (प्रदीप छांगाणी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर)दाखल असल्यामुळेव त्यामध्ये कोणताही निर्णय कार्यवाही झालेली नाही असे नमूद केले आहे. सन २०१७-१८ चे लेखापरीक्षण मध्ये लेखापरिक्षक यांनी विशेष अहवाल व विनिदिष्ट अहवाल जिल्हाउपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती तसेच पणन संचालक, पुणे यांचेकडे सादर केलेला असून सदर अहवालाचे आधारावर मोठ्या प्रमाणात आर्थीक अफरातफर झाल्यामुळे प्रविण वानखडे हे लेखापाल पदावर असल्याने तसेच सचिव इतर संबधीत कर्मचारी आणि संचालक मंडळावर फौजदारी कार्यवाही झालेली आहे. भारतीय दंड संहिता अंतर्गत केसेस दाखल असून सदर करिता प्रविण वानखडे यांची जमानत संबंधाने मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती यांचे आदेश स्पष्ट नमुद आहे. प्रविण वानखडे यांच्या यांचे विरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात येवुन दोषी सिद्ध झाल्यामुळे त्यांचा प्रभारी सचिवाचा प्रभार काढण्यात आला.. वेतनवाढ सुध्दा रोखण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने वादी यांनी प्रतिवादी क्र.१ तथा पणन संचालक, पुणे यांच्या दि.०६ सप्टेंबर २०२४ रोजीच्या आदेशासमिळण्याबाबत विनंती केली आहे. या प्रकरणी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे ३० जून २०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस वादी व प्रतिवादी यांच्यावतीने त्यांचे वकील हजर होते. सुनावणी दरम्यान या प्रकरणात यादींकडून विलंब झाला असल्याचे निर्दशनास आणून दिले आहे. याची यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन विलंब क्षमापन करण्याकरिता अर्ज सादर केला आहे. तसेच पणन संचालक तथा प्रतिवादी क्र. ०१ यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनीदेखील त्यांचे सविस्तर लेखी म्हणणे राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांचेकडे सादर केले आहे.

# राणा दाम्पत्यांच्या हस्ते गुणवत्ता प्राप्त ४८७० विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

## सांस्कृतिक भवन अमरावती येथे भव्य आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

दहावी व बारावीतील गुणवत्ता प्राप्त यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याकरिता तसेच भविष्यामध्ये त्यांना याहीपेक्षा यश मिळाव याकरिता विद्यार्थ्यांचे मनोबल वाढावे हा उद्देश ठेवून दरवर्षी युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने दहावी व बारावी मध्ये गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या भव्य सत्काराचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने यावर्षी सुद्धा भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक भवन अमरावती येथे गुणगौरव सोहळा २०२५ चे भव्य आयोजन करण्यात आले होते.

या भव्य दिव्य सत्कार सोहळ्याला राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे, आ.प्रविण तायडे, भाजपा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, भाजपा ग्रामिण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी सर्वप्रथम आ.रवि राणा, मा.खा.नवनित राणा यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांनी माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पुजन करुन व दीप प्रज्वलन करुन सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला औपचारिक रित्या सुरुवात झाली.



यावेळी सर्वप्रथम आ.रवि राणा, राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे, मा.खा.नवनित राणा यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा.खा.नवनित राणा यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करतांना सांगितले की, यश मिळविण्याकरिता सर्वप्रथम प्रामाणिक व ठामपणे मैदानात उतरावे. जिंकण्याची वा हरण्याची परवा न करता आपले प्रयत्न सुरु ठेवावे. तसेच आ.रवि राणा यांनी सांगितले की, मुलांच्या भवितव्याकरिता जीवाच रान करणाऱ्या आईवडिलांच्या कष्टाचे प्रत्येक विद्यार्थ्याने जाणीव ठेवून यश संपादन करावे.

या सत्कार समारंभात अमरावती जिल्ह्यातुन आलेल्या दहावी व बारावीच्या ४८७० विद्यार्थ्यांचा आ.रवि राणा, मा.खा.नवनित राणा यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन धडझ प्रवक्ते नाना आमले व प्रतिक्षा डांगे यांनी केले. तर या कार्यक्रमाच्या प्रसंगी जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, सुनिल काळे, डॉ.आशिष मालु, सुनिल राणा, विनोद जायलवाल, हुसेनजी सुभेदार, प्रा.अजय गाडे, कमलकिशोर मालानी, ज्योती सैरीसे, संजय हिंगासपुरे, सोनाली नवले, सुखदेव तरडेजा, अजय देशमुख, उमेश ढोणे, विनोद गुहे, किरण व.अंबाडकार, सुमती ढोके, अर्चना तालन, चंदा लांडे, ललीत समदुरकर, नितीन बोरेकर, तृप्ती वाठ, विजया घोडेस्वार, गणेशदास गायकवाड, सत्येंद्र लोटे, दर्शना जैन, आफताब सुभेदार, गंगाताई खारकर, सचिन भेंडे, मंगेश पाटील, ज्योती यावलकर, संजय मुनोत, आशिष गावंडे, अजय जयस्वाल, सुधा तिवारी, मिनल डकरे, संतोष साहु, प्रा.संतोष बनसोड, मिलींद कहाळे, प्रा.संदीप मुरतुंडकर, डॉ.चंद्रशेखर कुलकर्णी, समिक्षा गोटेफोडे, सिंधु मतलाने, अरुणा चचाने, डॉ.हरिराम भांडे, बंडु डकरे, किरण म.अंबडकार, तुषार दुधे, जगदीश अंबडकार, आशिष कावरे, श्याम कथे, अन्ना महल्ले, कुणाल गुप्ता, रवि अडोकार, विनय घिमे, वंदना जामनेकर, सविता नेवारे, लता अंबुलकर, निलेश भेंडे, संध्या भागवत, पराग चिमोटे, वैभव बजाज, गौतम हिरे, निता खडसे, सुरज मिश्रा, साक्षी उमक, लाठेकर काका, प्रविण मोखडे, संजय माहुलकर, ऋषिकेश जाधव, निता कैथवास, अर्जुन दाते, सद्दाम हुसेन, देवानंद राठोड, राजु हरणे, उपेन बछले, रविंद्र गवई, महेश मुलचंदानी, रवि वानखडे, तमीज शहा, राजेश वर्मा, आकाश पाटील, नितीन गावंडे, गजानन सावंत, मनोहर मारोडकर, प्रविण अरक, सचिन बोंडे, राहुल बजाज, संध्या रामटेके व असंख्य विद्यार्थी, पालकवर्ग तसेच युवा स्वाभिमान पार्टी व भारतीय जनता पार्टी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रंगोली स्पोर्ट्स क्लबमध्ये बॉक्सिंग व स्क्वॅश विभागाचे भव्य उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती,**
प्रिया पार्क, संभाजी महाराज चौक, नवसारी, वलगाव रोड येथील रंगोली स्पोर्ट्स क्लब येथे बॉक्सिंग आणि स्क्वॅश विभागाचे उद्घाटन गुरुवारी सायंकाळी ५ वाजता उत्साहात पार पडले.या









उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ.सुनील देशमुख,बबलू शेखावत,श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडा संचालिका श्रीमती अंजली ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.या प्रसंगी क्लबमध्ये सुरू करण्यात आलेल्या विविध क्रीडा सुविधा – बॉक्सिंग, स्क्वॅश, जिम, पोहणे, बॉक्स क्रिकेट, बॉक्स फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बिलियर्ड्स व एअर हॉकी यांची माहितीरंगोली स्पोर्ट्स क्लबस 'चालक नितीन देशमुख यांनी उपस्थितीतांना दिली.यावेळी खासदार बळवंत वानखडे यांचा शाल,श्रीफळ देत सत्कार हि करण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन श्री. नितीन आर. देशमुख, श्रीमती कल्पना एन. देशमुख, भूषण देशमुख व सौ. निकिता बी. देशमुख यांच्या पुढाकाराने करण्यात आले. कार्यक्रमास क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थिती होती.

# पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात व्याख्यानमाला

## विद्युत अभियांत्रिकी विभागाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती–** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावतीच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाने आयइइइ पुणे सेक्शनच्या सहकार्याने अभ्यासक्रम समृद्धी कार्यक्रमांतर्गत एक तज्ज्ञ व्याख्यानमाला सुरू केली आहे. या व्याख्यानमालेचा उद्देश प्राध्यापक व संशोधन विद्यार्थ्यांना अध्यापन नवकल्पना व विद्युत अभियांत्रिकीसह शैक्षणिक तंत्रज्ञानातील तांत्रिक प्रगतीबद्दल सखोल ज्ञान प्रदान करणे हा आहे.

ही व्याख्यानमाला दर शनिवारी आयोजित करण्यात आली आहे.




कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. एस. बी. वरकड (कार्यक्रमसमन्वयक) वडॉ. ए. एस. तेलंग (विभागप्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

तज्ज्ञ व्याख्याते व त्यांच्या विषयांचे तपशील पुढीलप्रमाणेआहेत डॉ. निधी मिश्रा, पुणे नवोन्मेषी अध्यापनासाठी अकसाधने. डॉ. अविनाश खरात, मॅटर, जेएसपिएम, पुणे डिजिटल कंटेंट विकास, डॉ. अंजली वैद्य, वरिष्ठ सल्लागार, पुणे इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम व इटीएपी, डॉ. प्रिया गोखले, विभागप्रमुख, जेएसपीएम, पुणे अनुभवाधिष्ठित शिक्षण व मूल्यमापन साधने, डॉ. एस. एम. बकरे, माजी अधीक्षक अभियंता, पुणे झ विद्युत प्रणालीतील औद्योगिक दृष्टिकोन व आधुनिक साधने या उपक्रमातून पीआरपीसीएम महाविद्यालयाचा सतत व्यावसायिक विकास, शैक्षणिक नवोन्मेष आणि आयइइइ सारख्या प्रतिष्ठित संस्थांशी सहयोग करण्याचा प्रयत्न अधोरेखित होतो. या व्याख्यानमालेमुळे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे.

# महामार्गावरील बार आणि रेस्टॉरेन्टला मध्यरात्रीपर्यंत परवानगी कुणाची ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नांदगाव पेठ–** राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल्स,बार आणि रेस्टॉरेन्टला रात्री ११ वाजेपर्यंतच पोलीस विभागाची परवानगी असतांना नांदगाव पेठ हद्दीत येणाऱ्या हॉटेल्स, बार आणि रेस्टॉरेन्टला मध्यरात्रीपर्यंत कुणाची परवानगी आहे असा प्रश्न शनिवारी झालेल्या राजकुमार सुंदरानी यांच्या हत्येच्या घटनेमुळे निर्माण झाला आहे.पोलीस विभागावर नेमके दडपण कुणाचे आहे हे समजायला अवघड असून राजकीय नेत्यांच्या बार अँड रेस्टॉरेन्टला मध्यरात्री ३ ते ४ वाजेपर्यंत मुभा दिली जात असेल आणि त्याठिकाणी गुंड प्रवृत्तीचे लोक येऊन शहराची शांतता आणि सुव्यवस्था बिघडवत असेल तर याला जबाबदार कोण हा यक्षप्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी राज्यात ड्राय डे घोषित असतांना महामार्गालगत असलेल्या न्यू किशन बार अँड रेस्टोरेन्ट मधून दिवसभर खुलेआम दुप्पट भावाने मद्यविक्री सुरू होती. रात्री साडे नऊ वाजता संबंधित प्रकारची माहिती पोलिस प्रशासनाला

**पोलीस यंत्रणेचा वचक राहला नाही**

**हत्येच्या घटनेने शासकीय यंत्रणेवर शंका**

देण्यात आल्यानंतर एका तासात नांदगाव पेठ पोलिसांनी त्या बार वर धाड टाकली तेव्हा असा कोणता प्रकार झालाच नाही, शांतता आहे असा पोलिसांकडून फोटो सह वरिष्ठांना अहवाल जाणे ही बाब खेदजनक असून अश्या लपवालपवी मुळेच एस.ए.इम्पेरियल बार अँड रेस्टॉरेन्ट समोर मध्यरात्री साडे तीन वाजता हत्येसारखा प्रकार घडतोय याला कुठेतरी पोलिस प्रशासन जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. दहा दिवस उलटूनही न्यू किशन बार अँड रेस्टोरेन्ट आणि येथून फुकट मद्याची बॉटल घेऊन जाणारे पोलीस कर्मचारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही हे विशेष! त्या दिवशी कार्यवाही झाली असती तर आज कदाचित ही दुर्दैवी घटना घडली नसती. महामार्गावरील असे अनेक हॉटेल्स, बार अँड रेस्टोरेन्ट आहेत जेथे रात्री ग्राहक कितीही वाजता गेले तरी मागच्या दाराने आत मध्ये घेतात. आणि मद्य व जेवणाची सुविधा पुरवितात. नेत्यांच्या हॉटेल्स ला वेगळे नियम आहेत आणि तेच रस्त्यांवरील पोटाची खळगी भरणारे लहान सहान हॉटेल्स आहेत त्यांना मात्र दहा वाजता कडक शिट्टी मारून पोलीस कर्मचारी घड्याळाची वेळ इशाऱ्याने दाखवत डोळे वटारून हॉटेल्स बंद करण्याचा आदेश देतात हे तरी कितपत योग्य आहे असा प्रश्न खऱ्या अर्थाने निर्माण होत आहे. नांदगाव पेठ ला नव्याने लाभलेले पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे हे अतिशय शिस्तप्रिय,कायद्याची कडक अंमलबजावणी करणारे आणि जनतेच्या सुरक्षेसाठी झटणारे अशी त्यांची पूर्वीची ओळख आहे त्यामुळे त्यांच्याकडून नांदगाव पेठ हद्दीतील नागरिकांना भरपूर अपेक्षा असून यापुढे हद्दीत बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर खाकी वर्दीचा दंडुका बसला पाहिजे तरच हद्दीत आणि पर्यायाने शहरात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होईल यात शंका नाही.

# 'वसा' संस्थेला सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार २०२५ जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती –** जखमी, आजारी, भटके आणि दिव्यांग प्राण्यांवर उपचार आणि पुनर्वसन करणाऱ्या 'वसा' (वसा कन्झर्वेशन ऑर्गनायझेशन अमरावती) या संस्थेची सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार–२०२५ साठी निवड करण्यात आली आहे. शिवसेनेचे नेते व आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाचे सर्वेसर्वा सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारी व्यक्ती, सामाजिक संस्था, संघटनेला दरवर्षी लोकगौरव पुरस्कार दिला जातो. एक लाख रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या पुरस्काराचे वितरण होईल.सोमेश्वर पुसतकर यांनी आपल्या हयातीत शेकडो गरजू लोकांना मदत केली. जात–पात, धर्म, विचारधारा, संघटना याचा विचार न करता त्यांनी समाजातील वेगवेगळ्या घटकांना कायम ताकद देण्याचे काम केले आहे. पुसतकर यांच्या कार्याचा वारसा चालत राहावा आणि त्यांच्या सारखे काम



करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना बळ मिळावे. यासाठी लोक फाउंडेशन, कृषी विकास प्रतिष्ठान, आझाद हिंद गणेशोत्सव मंडळ, न्यू आझाद हिंद गणेशोत्सव मंडळ व सोमेश्वर पुसतकर मित्रमंडळ या संस्थांच्या वतीने दरवर्षी पुसतकर यांच्या स्मृतीदिनी हा पुरस्कार देण्यात येतो. सन २०२१ मध्ये नानक रोटी ट्रस्ट, २०२२ ला संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, २०२३ ला रक्तदान समिती, अमरावती तर २०२४ ला कुष्ठरोग्यांच्या आयुष्यात नवी पहाट आणणाऱ्या तपोवन या संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. गोरक्षण संस्थेने उपलब्ध करून दिली वसाला जागा 'वसा' ही संस्था २००८ मध्ये शुभम सायंके, निखिल फुटाणे, गणेश अकर्ते व भूषण सायंके या तरुणांनी संकटात सापडलेल्या प्राण्यांना वाचवण्याच्या उद्देशाने स्थापन केली. छत्री तलावाजवळ मंगलधाम कॉलनीत उभारण्यात आलेल्या श्री गोवर्धन पशुवैद्यकीय रुग्णालय व 'वसा' प्राणी बचाव केंद्रात जखमी, आजारी, अनाथ आणि अपंग प्राण्यांना काळजी, उपचार आणि पुनर्वसन केले जाते. भटक्या आणि सोडून दिलेल्या प्राण्यांना सर्व प्रकारची आवश्यक वैद्यकीय मदत येथे दिली जाते. श्री गोरक्षण संस्था अमरावतीने या तरुणांना त्यांच्या कामासाठी मंगलधाम कॉलनीत जागा उपलब्ध करून दिली आहे.

# अमरावतीच्या ग्रामीण भागातील ५ हजार ८६७ नमुन्यांपैकी ५४ दूषित

## जिल्हा परिषदेकडून पर्यायी व्यवस्था

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१४अमरावती–** अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी नागरिकांच्या जीवावर उठले आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर ग्रामीण भागातील जलनमूने घेऊन त्याचे रासायनिक व जैविक परीक्षण केले जाते. त्यानुसार यावर्षीही जिल्ह्यातील काही ठिकाणांहून ५ हजार ८६७ जल नमूने घेण्यात आले. या जलनमून्यांचे परीक्षण काहीसे धक्कादायक असून त्यापैकी ५४ जलनमूने दुषित आढळून आले आहेत.

एवढ्या मोठ्या प्रमाणात जलनमूने दुषित आढळून आल्यामुळे जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग खळबळून जागा झाला असून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी त्या–त्या ठिकाणच्या आरोग्य यंत्रणेला दक्षतेच्या सूचना दिल्या आहेत. ज्या ठिकाणच्या पाण्याचे नमूने दुषित आढळून आले, तो स्रोत काही काळासाठी बंद करण्यात आला असून नागरिकांना पर्यायी व्यवस्था करुन देण्यात आली आहे. दरम्यान अशी स्थिती आणखी काही ठिकाणी उद्भवू नये म्हणून सर्व ठिकाणच्या पाणी स्रोतांची पाहणी करुन जलशुद्धीकरणासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात



आली आहे.जिल्हा परिषदेच्या नोंदीनुसार जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमधून एकूण ५ हजार ८६७ जलनमूने घेण्यात आले होते. त्यापैकी २ हजार ११३ जलनमून्यांचे रासायनिक तर ३ हजार ७९६ जलनमून्यांचे जैविक परीक्षण करण्यात आले. दरम्यान रासायनिक परीक्षणात २८ ठिकाणचे पाणी दुषित आढळून आले असून जैविक परीक्षणात २६ ठिकाणचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे दिसून आले. त्यामुळे हे स्रोत तत्काळ बंद करण्यात आले असून तेथील नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार ज्या ठिकाणच्या जलनमून्यांचे परीक्षण करण्यात आले, त्यातील ६२ जलनमून्यांचे जैविक परीक्षणही आवश्यक होते. त्यामुळे त्यामुळे एवढ्या जलनमून्यांचे दोन्ही प्रकारचे परीक्षण करण्यात आले.

शासनाच्या जल जीवन मिशन अंतर्गत दोन दिवसांपूर्वीच दुषित जलनमून्यांचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला प्राप्त झाला. त्यानुसार जिल्ह्याच्या १४ तालुक्यांमधील ५ हजार ८६७ जलनमून्यांची तपासणी केली गेली. काही नमून्यांचे रासायनिक तर जेथे गरज होती, अशा नमून्यांचे जैविक परीक्षण करण्यात आले. त्यानुसार ५४ ठिकाणच्या जलशुद्धीकरणाची शिफारस करण्यात आली आहे.

# दादाजी मित्र मंडळाची 'शिवशक्ती कावड यात्रा' धारणीतून 'ओंकारेश्वर' कडे रवाना

## भक्तीमय वातावरणात कलशयात्रेचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत, ओंकारेश्वर येथे पुजा, अर्चना, जलाभिषेकपश्चात महाआरती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४धारणी–** श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर दादाजी मित्र मंडळ धारणी तर्फे आयोजित शिवशक्ती कावड यात्रा राधाकृष्ण मंदिर धारणी येथून शनिवारी सकाळीच औंकारेश्वर ज्योतिर्लिंग तीर्थस्थळासाठी रवाना झाली. भगवा ध्वज, गणवेशधारी कावडधारी, टाळ मृदंगाच्या गजर अण हर हर महादेव च्या जयघोषाने संपूर्ण धारणी शहर तथा परीसरितील वातावरण पुर्णतः शिवमय झालेल दिसून आल. राधाकृष्ण मंदिर धारणी येथून थेट मध्यप्रदेशातील ओंकारेश्वरधाम साठी निघण्यापूर्वीच शिव उपासक व दादाजी मित्र मंडळ सदस्यांतर्फे सकाळी आठ वाजता पुजा, अर्चना व महाआरतीपश्चात पायी पदयात्रेला प्रारंभ केला. या मेळघाट शिवशक्ती कावड यात्रेच वैशिष्ट्य म्हणजे शिव उपासक भक्तजनांनी खांदयावर कावड घारण करीत त्यामध्ये गडगा, सीपना, तापी, खंडू, खापरा डोलार या सप्त नदीच्या पवित्र जलाने भरलेले कलश वाहत घेतलेले असून या 'शिव कलशकावड यात्रा'चे ठिकठिकाणी ग्रामीण भागातील गावकऱ्यांकडून जल्लोषात स्वागत, तर कुठे जलाभिषेक, फुलांची उधळण, ताशा पथक, फलक आणि तोरणाच्या माध्यमातून होत आहे.यात्रेचा शुभारंभ राधाकृष्ण मंदिरावर धर्माचार्य पंडित सूर्यप्रकाश मिश्री या हस्ते विशेष पुजनाने करण्यात आला. त्यावेळी धर्माचार्यायांनी या शिवशक्ती कलश कावड यात्रेच्या मंगलप्रस्थानासाठी विधीवत पुजन करून यात्रेच औपचारिक उदघाटन स्वतः धर्माचार्य पंडित सूर्यप्रकाश मिश्रा यांनी योग



आचार्य ललीत महाराज जोशी, अशोक भागवत, दिलीप सेईवाल, जय नवलाखे, देवेंद्र भागवत, अनुप क्षीरसागर, दिनेश बन्सोड व इतर सहकारी मित्र बांधव यांच्या मुख्य उपस्थितीत 'ध्वज निशानी' दाखवूनकेल. यात्रेत सहभागी महिला, युवा आणि जेष्ठ नागरिक यांचा उत्साह लाक्षणिय होता. शिवाच्या चरणी सेवा हीच आमची श्रद्धा.. असा शिव भक्तांचा भाव यावेळी स्पष्टपणे जाणवत होता.शिवभक्ती व शिव आराधनेचा वटवृक्ष असाच सदैव मेळघाटभर फुलत राहावाअखंडित परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे आजही जपत आहे. चोल त्यामुळेच धारणी परीसरात भक्ती, एकात्मता आणि धार्मिक आध्यात्मिकतेचा 'भक्तीरस संगम' यातून धारणीकरांना अनुभवयाला मिळतो आहे.या मेळघाट शिवशक्ती कावड यात्रेमध्ये अशोक भागवत यांच्यासह अनंता जाने, सुभाष मालवीय, मदन येळणे, योगेश शर्मा, ठाकूर, नितेश मेटकर अंकित मोहोड व्यतिरिक्त इतर मोठ्या संख्येत शिव उपासकांनी सहभाग नोंदवून ही 'शिवशक्ती कावड यात्रा' सफल करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### ओंकारेश्वरला होणार विशेष आराधना

शिवशक्ती कावड यात्रेचा समारोप हा ओंकारेश्वर पोहोचून पवित्र नर्मदा नदीच्या प्रवाहीत जलाने भगवान शिवशंकरांचा जलाभिषेक त्यापश्चात विशेष पुजार्चना, भक्ती आराधना, रुद्राभिक्षेक आणि सामुहिक महाआरतीचे आयोजन होणार आहे. त्यानंतर प्रसाद वितरण व महाभोजनाचा कार्यक्रम देखील कावड यात्रींसाठी दादाजी मित्र मंडळ परीवार धारणी तर्फे ठेवण्यात आला आहे.

### शिस्तबद्ध व भक्तीभावपूर्ण आयोजन

दादाजी मित्र मंडळ धारणीच्या वतीने काढण्यात आलेल्या या शिवशक्ती कावड यात्रेच अतिशय शिस्तबद्ध व व्यवस्थितपणे नियोजन करण्यात आल असून रस्त्यातील प्रत्येक विश्रांतीस्थळी आरोग्य सेवा, पिण्यायोग्य शुद्ध पाणी तसेच भोजन व्यवस्था यासंदर्भात विशेष काळजी घेण्यात आली असून त्यासाठी स्वयंसेवकांची निर्धारित विशेष टीम जागोजागी तैनात आहे.

# वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने किटकनाशक फवारणीने विषबाधेचा धोका अधिक

## कृषी विभागाचा शेतकऱ्यांना सल्ला, खरीप हंगामात खबरदारीची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ दर्यापूर**

तालुक्यात सर्वत्र खरीप हंगामातील पेरणी आटोपली आहे. सध्या बहरलेल्या पिकात तणनाशक व किटकनाशक फवारणीची लगबग सुरू आहे. हंगामात वेळेवर पेरणी झालेल्या पिकांवर तणनाशक व किटकनाशक फवारणी करताना आवश्यक काळजी घ्यावी. विषबाधा टाळावी. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने किटकनाशक फवारणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. यावर्षी शेतीतील पीक चांगले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. सद्यस्थितीत मजुरांअभावी तणनाशक व किड नियंत्रणासाठी किटकनाशक फवारणीची शेतकऱ्यांची धामधूम सुरू आहे. किटकनाशक फवारणी करताना योग्य काळजी न घेतल्यास विषबाधा झाल्याच्या घटना यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत. त्यामुळे किटकनाशक फवारणी करताना प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. फवारणी करताना शेतकऱ्यांनी दक्षता घ्यावी. किटकनाशकाचे मिश्रण काडी किंवा लाकडी दांड्याने नीट मिसळावे.



### नियमांच्या पालनासह फवारणी करावी; धोका नाही

खरीप हंगामात शेतकरी किड नियंत्रणासाठी विविध प्रकारच्या किटकनाशकांची फवारणी करताना शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. संरक्षक कपडे, बूट, हातमोजे, मास्क, चष्मा आदींचा वापर करावा. किटकनाशके अधिकृत कृषी सेवा केंद्रातूनच खरेदी करावीत. संबंधित विक्रेत्यांकडून बिल घ्यावे. नियमांच्या पालनासह फवारणी करावी. तक्रार असल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा, अशी प्रतिक्रीया प्रभारी तालुका कृषी अधिकारी अमोल सावरकर यांनी दिली.

### विषबाधा झाल्यास उपचार तातडीने

फवारणी करताना योग्य ती खबरदारी शेतमजुरांनी घेतली नाही तर विषबाधा होण्याची शक्यता बळावते. विषबाधा झाल्यानंतर क्षणाचाही विलंब न करता पुढील उपचारासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वेळेत उपचार सुरू झाले तर प्रभावी उपचारातून लवकर आराम मिळू शकतो, अशी माहिती तालुका आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गोळे यांनी दिली.

अपघाताने औषध अंगावर उडाल्यास त्वरित स्वच्छ धुवावे. नोझल साफ करण्यासाठी तार, काडी किंवा टाचणीचा वापर करावा. किटकनाशके मूळ पॅकिंगमध्येच खरेदी करावीत. तसेच फवारणीनंतर अंगावरील कपडे स्वच्छ धुवावेत. त्यानंतर अंग साबण लावून स्वच्छ पाण्याने धुवावेत, असा सल्ला देण्यात आला आहे.

# भातकुली न.पं. मुख्याधिकारी ३ महिन्यांत फक्त दहा दिवस हजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४भातकुली**

स्थानिक नगरपंचायतच्या मुख्याधिकारी भाग्यश्री बोरीकर यांची कार्यालयातील उपस्थिती जनतेला हैराण करणारी आहे. जेव्हापासून त्या रुजू झाल्यात तेव्हापासून त्यांच्यामार्फत एकही विकासाचे ठोस काम मार्गी लागले नाही. गेल्या ३ महिन्यांच्या कार्यकाळामध्ये फक्त १० झळकल्या. दिवसच त्या यावरून नगरपंचायतला मुख्याधिकारी नेमका असतो कशासाठी, हा प्रश्न भातकुलीवासीयांमध्ये निर्माण झाला आहे.

भातकुली नगरपंचायतमध्ये अंदाजे गेल्या १ ते दीड वर्षांपासून मुख्याधिकारी भाग्यश्री बोरीकर या रुजू झाल्या. तेव्हापासून जनतेच्या हितार्थ असणारे सर्व प्रश्न तसेच प्रलंबित आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असताना गावामध्ये अनेक ठिकाणी मोठमोठे गटार, डासांची उत्पत्ती, पिण्याचे पाणीनागरिकांच्या शासनाच्या प्रभागातील महत्त्वाची कामे पार असणाऱ्या योजनांसाठी थंडबस्त्यात पडली आहेत. मुख्याधिकारी नगरपंचायतला मुख्याधिकाऱ्यांच्या असणे बंधनकारक गैरहजेरीबाबत सत्ताधारी असतानासुध्दा मागील ३ महिन्यांच्या कार्यकाळामध्ये फक्त आणि फक्त जेमतेम १० दिवसच त्या नगरपंचायतला दिसून आल्या. त्यामुळे अध्यक्ष व विरोधी बाकावरील सदस्य सर्वसाधारण सभेमध्ये अनेकवेळा ओरडतात; परंतु त्याकडे कुणी लक्ष द्यायला तयार नाही. शहरातील विकासकामे, १९ - नगरसेवकांचे जूनरोजी त्यांच्या नगरपंचायतची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेला मुख्याधिकारी हजर होत्याः मात्र तेव्हापासून तर आजपर्यंत त्या फक्त एकच वेळ एक तासाच्या कालावधीकरिता दिसून आल्या. त्यामुळे आजच्या स्थितीत शहरातील संपूर्ण जनतेची अत्यंत महत्त्वाची असलेली कामे त्यामध्ये शिक्षण, आरोग्य या विषयीसुध्दा अनेर प्रकरणे नगरपंचायतला त्यांच्या अनुपस्थितीमुळे रेंगाळत पडली आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात जनतेमध्ये रोष निर्माण झाला असून, आठवडाभरामध्ये त्या नगरपंचायतला उपस्थित न झाल्यास त्यांच्याविरुध्द जनता रस्त्यावर उतरून नगरपंचायतला कुलूप लावल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा विरोधी पक्षनेत्यांनी दिला आहे.यासंदर्भात भातकुली नगरपंचायतच्या नगराध्यक्ष जनतेच्या हितार्थ कुठला निर्णय घेतात, त्यांच्या या भूमिकेकडे संपूर्ण भातकुली शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### २२ दिवसांत मुख्याधिकाऱ्यांची दोन तास हजेरी

भातकुली नगरपंचायतची सर्वसाधारण सभा १९ जून २० २५ रोजी घेण्यात आली होती. तेव्हापासून तर आजपर्यंत मुख्याधिकारी या फक्त एक दिवस तेही केवळ दोन तास हजर होत्या. तेव्हापासून मुख्याधिकारी या गैरहजर असून, त्यांच्यावर योग्य मार्गदर्शन घेऊन कारवाई करणार

**योगिताताई कोलटक्के, नगराध्यक्षा**

### मुख्याधिकाऱ्यांनी दीर्घकालीन रजा घेऊन मोकळे व्हावे

मुख्याधिकारी या गेल्या तीन महिन्यांपासून फक्त बोटावर मोजण्याइतके दिवस कार्यालयात दिसून आल्या. त्यामुळे शहरातील अनेक समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. यासंदर्भात येत्या दोन ते तिन दिवसांत मुख्याधिकाऱ्यांनी नियमित नगरपंचायतला यावे, अन्यथा त्यांच्या दालनाला कुलूप लावल्याशिवाय राहणार नाही,

**सोनालीताई शिंदे, विरोधी पक्षनेत्या**

# माजी मंत्री जगदीश गुप्ता यांचे दर्यापूर येथे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४दर्यापूर**

दर्यापूर माजी मंत्री जगदीश गुप्ता यांचा मुंबईमध्ये शिवसेनेत प्रवेश घेतला व ते अमरावती येथे आले असता १२ जुलै २०२५ ला तथा अमरावती जिल्ह्याचे माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांचे शिवसेना अमरावती जिल्ह्याच्या वतीने अमरावती विधानसभा व



दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची प्रतिमा भेट देऊन तसेच शाल व श्रीफळ देऊन यांप्रसंगी त्यांचे स्वागत करताना शिवसेनेचे अमरावती जिल्हाप्रमुख गोपाल पाटील,उपजिल्हाप्रमुख सुनील केने, अमरावती शहरप्रमुख आशिष ठाकरे, बहनेरा शहरप्रमुख मुकेश उसरे, अमरावती जिल्हा महिला आघाडीच्याजिल्हाप्रमुख अरुणाताई इंगोले, जिल्हाप्रमुख वंदनाताई दारवेकर, जिल्हाप्रमुख जयश्रीताई कातखिडे, बडनेरा शहरप्रमुख शारदाताई. शिवसेना महिला आघाडी महानगर प्रमुख रश्मीताई तायडे, सौ रोशनाताई निभोरकर, वैद्यकीय सेलवे जिल्हाप्रमुख राहुल मुंबर, गणेश गावंडे, नागोराव केने, अमर करोसिया, उपशहर प्रमुख आदित्य डांगे, पीयुष कराडे, सचिन गायगोले यांच्यासह असख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# बडनेराहून रेल्वे गाड्यांना चार सामान्य श्रेणीचे डबे : प्रवाशांना दिलासा मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४बडनेरा**

रेल्वेमध्ये सामान्य श्रेणीच्या डब्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मध्य रेल्वेने उपाययोजना हाती घेतल्या असून बडनेराहून जाणाऱ्या ४ एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांमध्ये कायमस्वरूपी प्रत्येकी चार अतिरिक्त सामान्य श्रेणीचे डबे जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या वर्षीपासून रेल्वे गाड्यांमध्ये सामान्य श्रेणीचे डबे वाढविण्याचे प्रयत्न सुरू



करण्यात आले. आता एकाचवेळी ४ रेल्वेगाड्यांमध्ये हे सामान्य डबे जोडण्यात येणार असल्याने प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

सामान्य डब्यांत होणारी अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने ही उपाययोजना केली आहे. रेल्वे प्रशासन केवळ प्रीमिअम दर्जाच्या गाड्या सुरू करून केवळ उच्च वर्गातील प्रवाशांकडे लक्ष देत असल्याचा आरोप होत होता. या पार्श्वभूमीवर रेल्वे मंत्र्यांनी एकूण १० हजार सामान्य डबे गाड्यांना लवकरच जोडले जातील, अशी ग्वाही दिली होती. सामान्य प्रवाशांचा प्रवास सोयीचा व्हावा, या हेतूने प्रत्येक गाडीला किमान ४ सामान्य श्रेणीचे डबे असावेत, अशी दक्षता घेतली जात आहे. मध्य रेल्वेने या गाड्यांची यादी प्रसिद्ध केली आहे.

विना आरक्षण प्रवास करणाऱ्यांना सुविधा अमरावती, बडनेरा येथून पुण्याला जाणारे चाकरमाने, विद्यार्थी, व्यापारी यांची संख्या मोठी आहे. ऐनवेळी आवश्यक काम आले की, आरक्षण मिळत नाही. अशात सामान्य श्रेणीच्या डब्यातून प्रवास करावा लागतो. दोनच डबे असल्यामुळे मोठी अडचण होते. परंतु, आणखी दोन सामान्य डबे वाढल्यानंतर गर्दी व अडचणीपासून दिलासा मिळेल.

# धामणगाव रेल्वेत रस्त्यांची दुरवस्था:खड्ड्यांमुळे रस्ते जलमय, लोकप्रतिनिधींचा प्रशासनाला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४धा.रेल्वे**

धामणगाव रेल्वे शहरातील रस्त्यांची स्थिती बिकट झाली आहे. शास्त्री चौक ते सेफला हायस्कूल दरम्यानचा मुख्य रस्ता आणि जुना धामणगाव शहरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून रस्ते तलावासारखे दिसत आहेत.



विशेषतः शाळकरी मुलांना या खराब रस्त्यांमुळे त्रास सहन करावा लागत आहे. आपत्कालीन सेवांनाही या परिस्थितीमुळे अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने मान्सूनपूर्व नियोजन न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांच्या तक्रारींनंतर लोकप्रतिनिधी या मुद्द्यावर आक्रमक झाले आहेत. विरोधकांनी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि विकास निधीच्या वाटपावर प्रश्न उपस्थित केले आहेत. सत्ताधारी पक्षाने या विषयाला विधानसभेत उचलून धरण्याचे आश्वासन दिले आहे.

आमदार प्रताप अडसड यांनी जुना धामणगाव लगतच्या कॉलनी परिसराच्या विकासाकडे होत असलेल्या दुर्लक्षाचा मुद्दा मांडला आहे. त्यांच्या मते, ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या करांच्या तुलनेत विकासकामे अत्यंत कमी आहेत. नगरपरिषद हद्दवाढ प्रस्तावाकडे दुर्लक्ष आणि अपूर्ण ले-आउट्स या समस्या विकासात अडथळा ठरत आहेत. विकास हा पक्षनिहाय नसून प्रत्येक नागरिकाचा हक्क असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

# वीस वर्षांपासूनच्या रस्त्याच्या स्वप्नासह ५० लाखांचा चुराडा भर पावसात डांबरीकरण केलेला रस्ता पंधरा दिवसांत उखडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अंजनगाव सुर्जी**

वीस वर्षांपासून रस्त्याचा पाठपुरावा, मागणी करत असताना अखेर यावर्षी डांबरी रस्त्याला सुरुवात झाली व नागरिकांना स्वप्नपूर्तीचा आनंद झाला. मात्र रहीवासीयांचे स्वप्न अवघ्या पंधरा दिवसांतच भंगले. पंधरा दिवसांपूर्वी करण्यात आलेला डांबरी रस्ता आतापासूनच ऑक्सीजनवर लागला असून सदर डांबरी रस्ता भर पावसात चिखलसदृश्य ओल्या भागावर डांबरीकरण केल्याने हा रस्ता उखडून निघत आहे.



रस्ता दर्जाहीन झाला असल्याने स्वप्ननगरी कॉलनी वासीयांच्या वीस वर्षापासूनच्या रस्त्याच्या स्वप्नासह ५० लाख रुपयांचा चुराडा झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कंत्राटदार व पालिकेच्या अभियंत्याच्या मनमानीने निकृष्ट दर्जा व गुनवत्ताहीन रस्ता झाला असल्याची ओरड होत आहे.

सदर झालेल्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहे. या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कंत्राटदार आणि संबंधित नगरपरिषदेच्या कामाच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या रस्त्यावरून कोणतीही जड वाहतूक होत नसताना पंधरा दिवसांत या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे.

आमच्या नगरात अत्यंत निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण करण्यात आले आहे. कंत्राटदाराने रस्त्यांची व्यवस्थित साफसफाई न करता डांबरीकरण करण्यात आले, तसेच पाऊस चालू असताना डांबरीकरण करण्यात आल्यामुळे रस्ता दर्जाहीन झाला आहे. आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडे कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करुन रस्ता पुन्हा करण्याची विनंती करणार आहे. अशी प्रतिक्रिया स्वप्नील तायडे, रा. स्वप्ननगरी कॉलनी यांनी दिली.

# तिवसा तालुका औद्योगिक बहूद्देशीय ग्रामीण सह. संस्थेत एकहाती सत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४तिवसा**

तिवसा तालुका औद्योगिक बहुद्देशीय ग्रामीण सहकारी संस्था र.नं. ३९७ ची निवडणूक जाहीर झाली असता ११ जागांसाठी १८ नामांकन पत्र दाखल झाले होते. पैकी ३ जुलै रोजी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी ५ नामांकन पत्र मागे घेण्यात आले होते. सर्वसाधारण कारागीर मतदारसंघात ६ जागांसाठी ८ नामांकन पत्र दाखल झाल्यामुळे ही निवडणूक घ्यावी लागली होती. रविवारी लागलेल्या निवडणूक निकालात समर्थ पॅनलचे सहाही उमेदवार विजयी झाले असून पूर्वीच ५ उमेदवार या पॅनलचे अविरोध निवडून आले असल्यामुळे या संस्थेवर समर्थ पॅनलची एकहाती सत्ता आली आहे

समर्थ पॅनलचे सर्वसाधारण जागेत ६ ही उमेदवार विजयी; ५ जागा आविरोधसर्व साधारण ६ जागांसाठी ८ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे ठाकल्याने ही निवडणूक घ्यावी लागली होती. या सहा जागेचा निकाल जाहीर झाला आहे. १४३३ मतदार असलेल्या या संस्थेत केवळ ११७मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

ही निवडणुक एकतर्फी झाली असून यामध्ये गोकुल मारोतराव खाकसे, सतीश विठ्ठलराव देशमुख, श्रीराम अरविंद देशमुख, सागर श्यामपंत राऊत, कमलाकर वामनराव वाघ, निलेश भीमराव हगवने हे उमेदवार विजयी ठरले आहे. सत्येंद्र ज्ञानेश्वर उल्हे, संजय रामगोपाल चाहक यांना अनुक्रमे ४ व७ मते मिळवून पराभव चाखावा लागला अविरोध निवडून आलेल्यामध्ये महिलाप्रतिनिधी म्हणून सौ. वंदना श्रीराम देशमुख, सौ. प्रतिभा अजय शिरभाते, इतर मागास प्रवर्गमधून प्रवीण ओंकारराव बडकस, विमुक्त जाती भटक्या जमाती मतदारसंघामधून सुभाष शामराव बोकडे, तर अनुसूचित जाती जमातीमधून दिलीप भीमराव वानखडे हे अविरोध निवडून आले होते.!समर्थ पॅनलची धुरा राष्ट्रीय काँग्रेसचे पदाधिकारी मुकुंद देशमुख, दिलीप काळबांडे, सतीश पारधी, शेतू देशमुख, नगरसेवक वैभव वानखडे, नगरसेवक योगेश वानखडे तसेच रहीम शहा यांनी साभाळली निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मनोज रोहनकर, सहायक उषा मून आदींनी कामकाज पाहिले.

# रस्त्यावर खड्डे व खड्ड्यात गटार नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष : नगरपरिषदेच्या स्वच्छतागृहाची घाण मुख्य रस्त्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४धामणगाव रेल्वे :**

येथील रेल्वेच्या मालधक्क्याला लागून असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहातील घाण पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे नगरपरिषद अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. दरम्यान, शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या महिलांकरिता प्रसाधनगृहांची सुविधा नसल्याने त्यांचीसुद्धा कुचंबना होत असल्याचे दिसून येत आहे.



येथील सिनेमा चौक गर्दीचा ठिकाण असून शहराच्या मुख्य रस्त्यावरच रेल्वेचा मालधक्का आहे. मालधक्क्याच्या भिंतीला लागून असलेल्या सार्वजनिकस्वच्छतागृहात, घाण पसरलेली असते. मुख्य रस्त्याच्या मालधक्का गेटवर मोठा खड्डा आहे. सदर मुतारीचे दुर्गंधीयुक्त घाण पाणी याच खड्ड्यात घात साचून रस्त्यावर येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे नगरंपरिषद अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिक करीत आहे.

स्वच्छतागृहाच्या समस्येची गंभीर दखल घेणे क्रमप्राप्त असून सदर घाण पाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्था नसल्याने मुतारीचीघाण रस्तावर मुख्य रस्त्यावर येत आहे. त्याठिकाणी कोणतीही साफसफाई होत नसल्याने भरचौकात रस्त्यावरघाण पाण्याचे डबके साचले असून त्यामधून दिवसभरात हजारो वाहने ये-जा करतात. त्यामुळे डबक्यातील ते घाणपाणी नागरिकांच्या अंगावर उडत आहे. तरी नगरपरिषद प्रशासनाने योग्य ती कारवाई न केल्यास नागरिक नगरपरिषदेसमोर आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे.

**महिलांसाठी स्वच्छतागृह नाही**

धामणगाव शहर हे विद्यानगरी व व्यापारिक बाजारपेठ म्हणून ओळखले जाते. त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात वर्दळ असते; परंतु शहरातील गांधी चौक, सिनेमा चौक, आठवडी बाजार आदी ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृह नसल्याने महिलांची कुचंबना होत आहे.

